अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# महागाईच्या चटक्याने दिवाळीच्या आनंदाला फटका

यंदाच्या दिवाळीवर महागाईचे सर्वात मोठे सावट होते असे म्हणायला हवे. अगदी फटाके विक्रीपासून ते सोनेनाण्याच्या खरेदीपर्यंत लोकांनी फारसा उत्साह दाखवलेला नाही. महागाईच्या या चटक्याने दिवाळीच्या आनंदाला फटका दिला. लोकांनी अनेक गोष्टींची तडजोड करून दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न केला. सातत्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असताना लोकांच्या उत्पन्नात कोणतीही मोठी भर पडत नाही. अशा परिस्थितीत उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ कसा साधायचा? हा प्रश्न सामान्य माणसासमोर ठाकलेला आहे आणि या गोष्टीची जाणीव आमच्या मायबाप सरकारला अजिबात होत नाही. सणासुदीला तरी सामान्य माणसाचा आनंद आणि उत्साह टिकून राहील अशी कोणतीही गोष्ट सत्ताधारी करू शकत नाहीत. सामान्य माणसाला दिलासा मिळावा याची मनापासून इच्छा नसल्यामुळेच महागाईचा हा आगडोंब प्रामुख्याने मध्यमवर्गीय माणसाला भरडून काढत आहे. कोणत्याही प्रकारची आर्थिक समीकरणे किंवा गणिते लावली तरीसुद्धा सध्याची परिस्थिती ही मध्यमवर्गीयांसाठी उत्साहवर्धक नसल्याचे स्पष्ट होते. याच्या तीन गोष्टी निदर्शक ठरतात. साधारणपणे दिवाळीच्या मुहुर्तावर वास्तु किंवा घरखरेदी केली जाते. धनत्रयोदशीचे निमित्त साधून सोने खरेदी केले जाते आणि उद्योग क्षेत्रात उसळी मारलेल्या निर्देशांकातून गुंतवणूक केली जाते. यंदा मात्र या तीनही गोष्टींच्या बाबतीत समाधानकारक परिस्थिती नसल्याचे दिसून आले. घरखरेदीबरोबरच वाहनखरेदीसाठी उडणारी झुंबड यंदा तर दिसेनाशी झाली होती. घर आणि मोटारगाड्यांसाठी अनेक सवलतीच्या योजना जाहीर करूनही लोकांनी त्यात फारसा रस दाखवलेला नाही. सोने खरेदीने पन्नास टक्क्यांपर्यंतच मजल मारल्यामुळे येणाऱ्या मंदीचीच चाहुल लागलेली आहे. बाजारातला निर्देशांक मनासारखा टिकलेला नाही. म्हणूनही शेअर बाजारात फारसे उत्साहाचे वातावरण नाही. या तीन चार गोष्टींच्या निकषांवरून आगामी वर्षातल्या आर्थिक उलाढालींचा अंदाज येतो. त्यात पुन्हा येणारे वर्ष हे निवडणूक वर्ष असल्यामुळे सामान्य माणसाला फार मोठा दिलासा मिळेल अशी कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

## मध्यमवर्गीयाने खर्च वाचवले

साधारणपणे दिवाळी हा सण मध्यमवर्गीय माणसाच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज सांगणारा असतो. यंदा जागोजागी स्वस्त दरातली फटाके विक्रीची दुकाने थाटली गेली. मतांचे राजकारण करणाऱ्या राजकारण्यांनी जर स्वस्त दरातल्या फटाक्यांच्याऐवजी जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात दिल्या असत्या तर त्याचा सामान्य माणसाला जास्त फायदा झाला असता. परंतु, ही गोष्ट देखील त्यांच्या आवाक्याबाहेर होती. जागोजागी दुकाने थाटूनही त्यांना पाहिजे तशी विक्री झालेली नाही. मुळातच लोकांनी यावर्षी पैशाचा वापर सांभाळून केलेला आहे. फटाके, कपडे, सोनेनाणे, मिठाई यासारख्या साधारणपणे नेहमीच्या जिन्नसांच्या खरेदीवर ग्राहकांनी जवळपास बहिष्कार टाकल्यासारखी परिस्थितीबरोबर शुभेच्छापत्रांचेही धाबे दणाणले. मोबाईल कंपन्यांना फटके बसले. कारण एसएमएसचे प्रमाणही रोडावले. ऐन दिवाळीच्या आधीच पेट्रोल डिझेल एवढेच नव्हे तर स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरच्या किमतीतही वाढ केली गेली. महागाईचा हा सगळा चटका आणि फटका बघून लोकांनी खर्चापेक्षा बचतीवर लक्ष केंद्रित केले. कारण कोणत्याही परिस्थितीत महागाई कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. सरकार तसे प्रयत्नही करत नाही. सरकारच्या भरोशावर राहून उपयोगाचे नाही. उत्पन्न जरी वाढवता येत नसले तरी खर्च कमी करता येईल, असा शहाणपणाचा विचार करून लोकांनी यंदाची दिवाळी रेटून नेलेली दिसते. ज्या किमान गोष्टींची दिवाळीमध्ये आवश्यकता असते त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न लोकांनी केला. या सर्व गोष्टी येणारे वर्ष हे सामान्य माणसाची आणि गरिबाची आणखीनच परीक्षा पाहणारे असेल असेच म्हणणे भाग पडते. दिवाळीचा सण साजरा करण्यात लोकांनी दाखवलेला शहाणपणा त्यांच्या दृष्टीने योग्यच ठरतो. पण सरकारने दिवाळीतल्या या मंदीच्या वातावरणातून शहाणपणाचा धडा घेतला पाहिजे.

## निवडणूक वर्षात पैशांचा पाऊस

येणारे वर्ष तर निवडणुकांच्या धामधुमीचे वर्ष ठरेल. पुढच्या दिवाळीपूर्वी सहा-सात राज्यांच्या विधानसभा निवडणुका होतील. तर लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीने सगळा देश घुसळून निघेल. सामान्य माणसाचा खिसा जरी रिकामा झालेला असला तरी राजकारण्यांच्या आणि भांडवलदारांच्या तिजोऱ्या मात्र या काळात भरलेल्या असतील. अक्षरश: पाण्यासारखा पैसा खर्च करून निवडणुका लढवल्या जातील. त्यातला खेदजनक भाग असा आहे की, जिथे सामान्य माणूस काटकसर करून जीवन जगतो त्याच समाजामध्ये राजकारणी मात्र निवडणुकांसाठी पैशांचा अक्षरश: पाऊस पाडतात. या दोन परस्परविरुध्द गोष्टी पाहिल्यावर आपला देश सामाजिक पातळीवर फार मोठ्या प्रमाणावर विभागला जात आहे हे स्पष्ट होते. मूठभर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. तर मध्यमवर्गीय आणि गरीब आहे त्याच परिस्थितीमध्ये जीवन जगत आहे. एकाच देशात, एकाच समाजामध्ये प्रत्येकाच्या आर्थिक उत्पन्नातली ही भयानक विषमता खरे तर धोक्याचा इशारा समजली पाहिजे. हा प्रवाह जर असाच चालू राहिला तर आज नाही तर आणखी दहा वर्षांनी एका सामाजिक यादवीला आमंत्रण दिल्यासारखेच ठरणार आहे. यंदाची दिवाळी आनंदाची होती. पण ती तो आनंद द्विगुणित करणारी होती की नाही याबद्दल शंका आहे.